प्रेस नोट

पो.स्टे अवधुतवाडी
दिनांक- ०५/०२/०२५

# पो.स्टे अवधुतवाडी हददीतील कुख्यात गुंड साहेबराव पवार यास MPDA अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस ठाणे अवधुतवाडी हददीतील इसम नामे साहेबराव उर्फ नितीन विश्राम उर्फ इसराम पवार वय ४१ वर्ष रा.अमराईपुरा, यवतमाळ याचा गुन्हेगारी अभिलेख सन २०१३ पासुन असल्याने व त्याचे विरुध्द खुनासह दरोडा, घातक शस्त्र बाळगणे, मारहाण करणे, संपत्तीचे नुकसान करणे , गंभीर जखमी करणे, जिवेमारण्याचा प्रयत्न करणे,असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे पो.स्टे अवधुतवाडी व लोहारा येथे नोंद असल्यामुळे व यवतमाळ शहर परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण केले असल्यामुळे तसेच वेळोवेळी प्रतिबंधक कार्यवाही करुनही सार्वजनिक सुवेस्थेस बाधा पोहचवणारी कृत वाढत असल्याचे दिसुन आल्याने त्याच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याकरीता ठाणेदार पो.स्टे अवधुतवाडी यांनी MPDA अंतर्गत स्थानबध्द करणेबाबत प्रस्ताव तयार करुन मा.पोलीस अधिक्षक सो.यवतमाळ यांचे मार्फतीने मा.जिल्हा दंडाधिकारी सो.यवतमाळ यांचे कडे सादर केला. सदर प्रस्तावास मा. जिल्हा दंडाधिकारी सो.यवतमाळ यांनी मंजुरी दिल्याने दिनांक ०३/०२/२०२५ रोजी स्थानबध्दतेचा आदेश पारीत केल्याने त्यास आज रोजी भंडारा जिल्हा कारागृहात १ वर्षा करीता MPDA १९८१ (सुधारना २०१५) नुसार स्थानबध्द करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा.श्रीकुमार चिंता पोलीस अधिक्षक सा.यवतमाळ, अपर पोलीस अधिक्षक पियुष जगताप सा, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग यवतमाळ श्री दिनेश बैसाने सा, यांचे मार्गदर्शनात पो.नि नरेश रणधिर यांचे नेतृत्वात सपोनि/धैर्यशिल घाडगे, सपोनि/रोहीत चौधरी, पोलीस हवालदार विशाल भगत, बलराम शुक्ला, रुपेश ढोबळे, पो.कॉ/मोहम्मद भगतवाले, पो.कॉ/प्रतिक नेवरे, सर्व नेमणुक पो.स्टे अवधुतवाडी यांनी पार पाडली.

